# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

## परिपत्रक क्र. ११५/२०२०

**विद्यापीठ विभाग/मान्यताप्राप्त संशोधन केंद्र येथे संशोधन करणाऱ्या विद्यार्थ्यांच्या एम.फिल./पीएच.डी. मौखिक परीक्षे (Viva-Voce) बाबत.**

शासनाने मार्च २०२० मध्ये घोषित केलेल्या लॉकडॉऊन पूर्वी विद्यापीठ विभाग/मान्यताप्राप्त संशोधन केंद्र येथे एम.फिल./पीएच.डी. संशोधन करणाऱ्या विद्यार्थ्यांचे संशोधनाचे काम पूर्ण झाल्यामुळे विहित कार्यपध्दती अवलंबून मौखिक परीक्षांच्या (Viva-Voce) तारखा निश्चित करण्यात आलेल्या होत्या. तथापी, लॉकडॉऊनमुळे निश्चित केलेल्या Viva-Voce स्थगित करण्यात आल्याने याबाबतची प्रक्रिया पूर्ण करता आलेली नाही. विद्यापीठ अनुदान आयोगाने विहित केलेली मार्गदर्शक तत्वे तसेच शासनाने दिलेल्या सुचनेनुसार एम.फिल./पीएच.डी. संशोधक विद्यार्थ्यांच्या मौखिक परीक्षा (Viva-Voce) व्हिडीओ कॉन्फरंसिंगव्दारे घेता येणार आहेत.

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ मान्यता प्राप्त संशोधन क्रेंद येथे संशोधन करीत असलेल्या ज्या विद्यार्थ्यांचे एम.फिल./पीएच.डी. अभ्यासक्रमांसाठी विहित केलेल्या तरतुदीनुसार संशोधन पूर्ण झालेले आहेत अशा विद्यार्थ्यांची व्हिडीओ कॉन्फरंसिंगव्दारे मौखिक परीक्षा (Viva-Voce) घेण्यासंदर्भातील करावयाच्या कार्यवाही बाबत विद्यापीठ परिपत्रक क्र. ११३/२०२० दि. ०८/०६/२०२० अन्वये सर्व संबंधिताना सूचना देण्यात आलेल्या आहेत. या संदर्भात पुढे असे ही सूचित करण्यात येते की, मौखिक परीक्षा (Viva-Voce) कार्यवाही करताना पुढील बाबांची पुर्तता करणे आवश्यक आहे.

१. संशोधक विद्यार्थ्यीने सादर केलेल्या प्रबंध/प्रबंधिका संदर्भातील परिक्षकांचे अहवाल विहित तरतुदीनुसार विद्यापीठास प्राप्त होणे आवश्यक असून अहवालासंदर्भात मार्गदर्शकाने शैक्षणिक प्रवेश विभाग यांच्याकडून अद्ययावत माहिती प्राप्त करून घ्यावी.

२. मार्गदर्शकाने विद्यापीठ विभागप्रमुख, बाहय परिक्षक यांच्या सोबत चर्चा करून अनुमती प्राप्त झाल्यानंतर संशोधक विद्यार्थ्यांच्या मौखिक परीक्षेचे (Viva-Voce) नियोजन करावे.

३. मार्गदर्शकाने मौखिक परीक्षेसाठी (Viva-Voce) Request generate करण्याची प्रक्रिया किमान १५ दिवस आधी पूर्ण करणे आवश्यक आहे.

४. **संशोधक विद्यार्थ्यांची मौखिक परीक्षा (Viva-Voce) विद्यापीठातील ecdlic (Econtent Development and Learning Innovation Center) मार्फत घ्यावयाची असल्याने या बाबत विद्यापीठ विभागप्रमुख यांनी संचालक ecdlic (Econtent Development and Learning Innovation Center) यांच्या सोबत चर्चा करून Viva-Voce नियोजन करणे आवश्यक आहे.**

तरी, वरील दिलेल्या सूचनेनुसार तसेच परिपत्रक क्र. ११३/२०२० मधील विहित केलेल्या कार्यप्रणाली नुसार एम.फिल./पीएच.डी. मौखिक परीक्षा (Viva-Voce) घेण्याबाबत कार्यवाही करण्यात यावी.

12/6/2020

उपकुलसचिव
शैक्षणिक प्रवेश विभाग

गणेशखिंड, पुणे ४११ ००७. )
संदर्भ क्र. शै.प्रवेश/९८९ )
दिनांक : १२/०६/२०२० )

प्रत:

मा. विभागप्रमुख, सर्व शैक्षणिक विभाग, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे
मा. प्राचार्य/संचालक, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ संलग्नित महाविद्यालय/ संस्था/मान्यताप्राप्त .संशोधन केंद्र.

आपणास विनंती करण्यात येते की, सदर परिपत्रक आपल्या विभागात/संशोधन केंद्रात पीएच.डी. अभ्यासक्रमास नोंदणी झालेल्या विद्यार्थ्यांच्या तसेच मार्गदर्शकांच्या निदर्शनास आणून देण्यात येऊन उपरोक्त दिलेल्या सुचनेनुसार कार्यवाही करण्यात यावी.